


# गर्भारपण आणि स्तनपान

सुजेचे वेगवेगळे आमवात विशेषत: तरुण स्त्रियांना होतात. कधी लग्नानंतर लगेचच बोटांचे सांधे सुजू लागतात तर कधी पहिल्या बाळंतपणानंतर. अशा परिस्थितीत मूल होऊ द्यायचे की नाही हा बिकट प्रश्न उभा राहतो. आमवातात प्रतिकारशक्तीचे दोष निर्माण होतात. गर्भारपणात प्रतिकारशक्ती आणखीनच बदलते. म्हणूनच या काळात मूल होण्याविषयी डॉक्टरांशी सविस्तर चर्चा केली पाहिजे.

औषधांनी ऱ्हुमॅटॉइड आमवात नियंत्रणात आला की अशा रुग्णांनी गर्भधारणेचा विचार करण्यास हरकत नसते. बऱ्याच रुग्णांच्या आजाराची तीव्रता गर्भारपणात कमी होते. ही सुधारणा दुसऱ्या-तिसऱ्या महिन्यात सुरू होते आणि प्रसवापर्यंत टिकते. आजाराचा बाळाच्या वाढीवर कोणताही विपरीत परिणाम होत नाही. तसेच आजारामुळे ॲबॉर्शन होईल अशी शक्यताही नसते. त्यामुळे आमवात आहे म्हणून बाळंतपणात कोणतीही विशेष काळजी घ्यावी लागत नाही. आमवातात काही प्रमाणात आनुवंशिकता असली तरी जन्मणाऱ्या प्रत्येक बाळाला आमवात होण्याची शक्यता फारच थोडी असते.

गर्भधारणेचा निर्णय घेण्यापूर्वी योग्य आणि प्रभावी औषधे वापरून आजार नियंत्रणात आलेला पाहिजे. आईने घेतलेली बहुतेक औषधे रक्तातून गर्भापर्यंत जातात. काही औषधे सुरू असताना गर्भधारणेला परवानगी नसते. (तक्ता पहा). ती औषधे बंद करून गर्भाला अपाय न करणारी औषधे वापरावी लागतात. कोणत्याही औषधाचा डोस कमीत कमी असलेला बरा. चुकून उपद्रवी औषध घेतले गेले तरी घाबरून जाण्याचे कारण नाही. अशा वेळी सोनोग्राफी करून गर्भात दोष दिसला तरच डॉक्टरांकडून ॲबॉर्शन करून घ्यावे.

काही औषधे आईच्या दुधातून स्रवतात आणि बाळाच्या शरीरात जातात. बाळासाठी ते औषध अनावश्यक असते तसेच अपायकारीही असू शकते. सामान्यत: औषधानंतर दोनेक तास बाळाला पाजू नये (तक्ता पहा). बाळाला वरचे अन्न लवकर सुरू करावे म्हणजे वेळ आली तर अंगावरचे दूध बंद करता येईल.

**संदर्भ :** नेचर रिव्ह्यू ऱ्हुमॅटॉलॉजी खंड ५, पृ. ३८२ जुलै २००९
नेचर क्लिनिकल प्रॅक्टिस ऱ्हुमॅटॉलॉजी खंड ३, पृ. ४०० जुलै २००७

## औषधांविषयी सूचना (डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक)

| | औषध | दर्जा | गर्भवती स्त्रिया | बाळाला पाजणाऱ्या माता |
|---|---|---|---|---|
| १. | पॅरासेटॅमॉल | अ | निर्धोक | निर्धोक, दूध पाजल्यावर लगेच औषध घ्यावे. |
| २. | इतर वेदनाशामक औषधे* | ब | ३० आठवड्यांपर्यंत कमीतकमी मात्रेत वापरावे. बाळाची सोनोग्राफी दरमहा. | निर्धोक. दूध पाजल्यावर लगेच औषध घ्यावे. |
| ३. | स्टिरॉइडस् (प्रेडनिसोन) | क | फक्त प्रेडनिसोनच वापरावे. ते गर्भापर्यंत जात नाही. मात्रा कमीतकमी वापरावी. | निर्धोक. औषधानंतर दोन तासांनी बाळाला पाजावे. |
| ४. | क्लोरोक्विन व हायड्राक्सि-क्लोरोक्विन | क | निर्धोक. गर्भाच्या श्रवणेंद्रियावर परिणाम. | निर्धोक. दुधातून २-९ तास येत राहते. |
| ५. | सल्फासॅलॅझिन | ब/ड | निर्धोक. बाळात व्यंगाचा एकच रिपोर्ट. | चालते. तरीही बाळाचे रक्त अधूनमधून तपासावे. |
| ६. | मेथोट्रेक्सेट | क्ष | गर्भधारणेपूर्वी २-३ महिने बंद करावे. | धोका शक्य. परंतु सिद्ध नाही. औषधानंतर ९ तास पाजू नये. |
| ७. | लेफ्लुनामाइड | क्ष | गर्भधारणेपूर्वी २ वर्षे बंद. कोलेस्टायरामाइन-ने निर्विषीकरण होते. | वापरू नये. दुधातून येण्या-विषयी माहिती नाही. |
| ८. | जैविक औषधे | ब/क | गर्भधारणा होईपर्यंत चालतात. बाळाच्या व्यंगाविषयी फारसा पुरावा नाही. | दुधात फारसे जात नाही. बाळावरील परिणामाविषयी अद्याप पुरावा नाही. |

अ : निर्धोक
ब : प्राण्यांमध्ये निर्धोक. मनुष्यप्राण्यांना धोकादायक असल्याचा पुरावा नाही.
क : प्राण्यांमध्ये धोका. मनुष्यप्राण्यात प्रयोग नाहीत.
ड : मनुष्यप्राण्यात धोका. परंतु लाभ जास्त असल्याने काळजीपूर्वक वापरावे.
क्ष : वापरू नये. बाळात व्यंग निर्माण होते.

* आयबुप्रोफेन त्यातल्या त्यात बरे. पहिले ३ महिने घेतल्यास अपायाची शंका.

संदर्भ : संधिवात औषधे आणि आहार-विहार

**डॉ. श्रीकान्त वाघ**
एम.बी.बी.एस. (मुंबई), एम.डी. (मेडिसिन), एम.एस्सी. ऱ्हुमॅटॉलॉजी (युके)
बी.ए.एम.एस., एम.ए.एस्सी. (चिकित्सा), एम.ए. (संस्कृत) एम.ए. (संगीत)
ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट (संधिविकार विशेषज्ञ)